**<u>श्री. संतोष र. भरड, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता यांचे न्यायालय</u>**

**समरी फौ. प्र. क्र.६९/२०२५**
**निशाणी क्र. ८**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे प्रकरण २१ अन्वये</u>**

**<u>संक्षीप्त संपरिक्षण केलेला अभिलेख -</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | १६/०५/२०२४ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | १०/०१/२०२५ |
| ३. | फिर्यादिदाराचे नाव, त्याच्या आई व वडिलांचे नाव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान ईत्यादी | : | महाराष्ट्र शासनतर्फे पोलीस स्टेशन, राहाता |
| ४. | आरोपीचे नाव, त्याच्या आई व वडिलांचे नाव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान ई | : | आक्रम निसार शेख, ता. नवनाथनगर, ता. राहाता, जि. अहमदनगर, |
| ५. | ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावुन सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | : | कलम १२-अ म.जु.का |

तुम्ही दिनांक १६/०५/२०२४ रोजी १२:४० वाजताचे सुमारास नगर मनमाडे रस्त्याच्या कडेला येथे एका पत्र्याचे टपरीच्या आडोश्याला विनापरवाना बेकायदारित्या कल्याण मटका नावाचा हारजितीचा जुगार खेळताना, खेळवितांना मुद्देमालासह मिळून आला आणि त्याव्दारे तुम्ही मुंबई जुगार कायद्याचे कलम १२ (अ) खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे आणि म्हणून मी तुमच्यावर मुंबई जुगार कायद्याचे कलम १२ (अ) नुसार अभियोग चालविण्याचा आदेश देत आहे.

प्रश्न क्र.१ :- तुम्हाला पोलीस नकला मिळाल्या काय ?
उत्तर :- होय.
प्रश्न क्र.२ :- तुमचेवर ठेवलेला आरोप तुम्हाला समजला काय ?
उत्तर :- होय.
प्रश्न क्र.३ :- तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर :- होय.
प्रश्न क्र.४ :- तुम्हाला सरकारतर्फे मोफत सल्लागार पाहिजे काय ?
उत्तर :- नाही.

समक्ष,
SANTOSH RAMAKANT BHARAD
Digitally signed by SANTOSH RAMAKANT BHARAD
Date: 2026.05.09 14:45:09 +0530
(सं. र. भरड)
न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग
**(**कोर्ट क्रं**.**२**)** राहाता

राहाता.
दिनांकः ०९/०५/२०२६.

............................

आरोपींची सही

७. साक्षीपुराव्याबाबत अधिटिपण्या

आरोपीने आपला गुन्हा कबुल केला आहे व आरोपीने तो आपल्या स्वेच्छेने कबुल केला आहे. आरोपीला गुन्ह्याचे परिणाम समजावुन सांगितलेले आहे. आरोपीचा पहिला गुन्हा असल्यामुळे त्याने दंड आकारतांना दयेची विनंती केलेली आहे. अपराधाचे स्वरुप व इतर बाबी विचारात घेवुन माझ्या मते खालील शिक्षा ही न्यायोचीत राहील. म्हणुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपीला कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा प्रमाणे दोषी ठरवून त्यांना कोर्ट उठेपर्यंत शिक्षा आणि प्रत्येकी ३००/- रुपये (रुपये तिनशे फक्त) दंड ठोठाविण्यात येत आहे आणि दंड न भरल्यास १५ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागेल असे आदेशीत करण्यात येत आहे.

२. अपिल कालावधी संपल्यानंतर जप्त मुद्देमाल -

i) रक्कम रुपये ८२०/- ही सरकार जमा करण्यात यावी.

SANTOSH RAMAKANT BHARAD
Digitally signed by SANTOSH RAMAKANT BHARAD
Date: 2026.05.09 14:45:13 +0530
(सं. र. भरड)
२रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
राहाता

राहाता.
दिनांकः ०९/०५/२०२६